(५) पोट-कलम (२) व (४) मध्ये निर्देश केलेल्या संबंधित व्यक्तीने, जर जन्म अथवा मृत्यूसंबंधीचा उतारा, त्यामध्ये विहित केलेल्या मुदतीत घेतला नाही, तर निबंधक अथवा पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी अथवा संबंधित संस्थांच्या प्रभारी व्यक्ती, सदर उतारे संबंधित कुटुंबास टपालाने पूर्वोक्त मुदत संपल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पाठवतील.

**९. विलंबित नोंदणीसाठी प्राधिकारी व त्यासाठी द्यावी लागणारी विलंब फी.-** (१) कोणत्याही जन्माची अथवा मृत्यूची माहिती, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर परंतु जन्म अथवा मृत्यूच्या घटनेनंतर तीस दिवसांच्या आत निबंधकास दिली गेली असेल तर दोन रुपये विलंब फी भरल्यानंतर नोंदणी करण्यात येईल.

(२) कोणत्याही जन्म अथवा मृत्यूची माहिती, निबंधकास ही घटना घडल्यापासून तीस दिवसांनंतर परंतु एक वर्षाच्या आत दिली गेली असेल तर यासाठी ग्रामीण भागासाठी गट विकास अधिकारी तसेच शहरी भागासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी/आरोग्य अधिकारी/मुख्याधिकारी/कार्यकारी अधिकारी यांच्या लेखी परवानगीने आणि पाच रुपये विलंब फी भरल्यानंतरच नोंदणी करण्यात येईल.

(३) जर एखादी जन्म अथवा मृत्यूची घटना, घडल्यापासून एक वर्षाच्या आत नोंदणी झाली नसेल, तर त्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने व रुपये दहा विलंब फी भरल्यानंतरच नोंदणी करण्यात येईल.

**१०. कलम १४ च्या प्रयोजनासाठी कालावधी .-** (१) जेव्हा कोणत्याही मुलाच्या जन्माची नावाशिवाय नोंदणी करण्यात आली असेल तेव्हा अशा मुलाचे आई-वडील किंवा पालनकर्ता मुलाच्या नावासंबंधी माहिती तोंडी

Scanned by CamScanner